नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०७/२०२५ (सोमवार)**

---

## फार्म हाउसवर अवैधरित्या गांजा आणि दारूचे सेवन करणाऱ्या आरोपीतांवर गुन्हा नोंद,स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी
## २ लाख ८० हजार ६९५ रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक १४/०७/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की,पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील आर.बी. फॉर्महाउस मध्ये विना परवाना काही इसम दारू पिउन पार्टी करीत आहेत. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी नमुद घटनास्थळी जावुन धाड टाकली असता नमुद ठिकाणी मॅनेजर आरोपी नामे एंजिल रामरतन बैस्वारे, वय २४ वर्षे,रा. मार्टिन नगर, जरीपटका, नागपुर हा मिळुन आला. त्याला विचारपुस करून फार्म हाउसची पंचासमक्ष झडती घेतली असता, फार्म हाउसच्या मागील बाजुस स्विमींग पुल जवळ ९ इसम दिसले. काही उभे होते तर काही आरोपी हे स्टीलच्या ताटात ठेवलेली हिरवट रंगाची भुकटी रोलींग पेपर सह प्लॉस्टीक पुंगळीमध्ये भरून तिला सिगारेट सारखे पेटवुन सेवन करीत होते. तसेच त्यांच्याजवळ विदेशी दारू बाळगुन सेवन करताना दिसले. त्यांना त्यांची नावे पत्ता विचारला असता आरोपी क्रं १) कुणाल चंद्रमणी मेश्राम, वय २६ वर्षे, रा गोपलनगर बसस्टॉपजवळ, नागपुर आरोपी क्रं २) पराग विजय शेंडे , वय २७ वर्षे, रा गोपलनगर दुसरा बसस्टॉप जवळ,करीम लेआउट नागपुर आरोपी क्रं ३). सुजल लक्ष्मीकांत घडले, वय २१ वर्षे, रा प्लॉट क्रं ०१,संघमित्रा बुध्दविहार जवळ ,प्रताप नगर , नागपुर आरोपी क्रं ४). आर्यन प्रविण नहाते, वय २१ वर्षे, रा प्लॉट क्रं ४९,श्रीनगर,परसोडी लेआउट, नागपुर आरोपी क्रं ५). आयुष कमलाकर कांबळे, वय २१ वर्षे, रा. त्रिमुर्ती नगर, द्रोणाचार्य नगर, पारेख लेआउट, प्लॉट क्रं १६९ नागपुर आरोपी क्रं ६) आदित्य रामेश्वर मेश्राम, वय २१ वर्षे, रा कुडवा, वार्ड क्रं ०३,ता. जि. गोंदीया ह.मु. गोपलनगर दुसरा बसस्टॉप,नागपुर आरोपी क्रं ७) शानु प्रदीप लोखंडे, वय २१ वर्षे, रा गोपलनगर, गायत्रीनगर, तिसरा बसस्टॉपजवळ, नागपुर आरोपी क्रं ८) सर्वेश राजेंद्र मेश्राम, वय २१ वर्षे, रा. प्लॉट क्रं ३३ गिट्टीखदान लेआउट, प्रतापनगर, नागपुर आरोपी क्रं ९) रोहीत अरविंद पाटील, वय २५ वर्षे, रा प्लॉट क्रं ५१, गिट्टीखदान लेआउट, प्रतापनगर, नागपुर

अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. त्यांना विदेशी दारू बाळगण्याचा परावान्याबाबत विचारना केली असता नमुद आरोपीतांकडे कोणताही परवाना नव्हता.

**पोलीसांनी घटनास्थळी पंचनामा करून गांजा पिण्याचे साहीत्य, गांजा सदृश्य भुकटी, ४ विदेशी दारू बॉटल आणि ७ अॅड्रॉईड मोबाईल आणि ३ अॅपल कंपनीचे मोबाईल असा एकुण किंमती २,८०,६९५ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

वर नमुद आरोपी क्रं १ ते ९ आणि आरोपी क्रं १० मॅनेजर आरोपी नामे एंजिल रामरतन बैस्वारे, वय २४ वर्षे,रा. मार्टिन नगर, जरीपटका, नागपुर यांच्या वर कलम २७,२९ एनडीपीएस कायदा सहकलम ६५ ई, ६८ महा. दारूबंदी कायदयन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## अमरावती —नागपुर राष्ट्रीय महामार्ग क्रं ६ चौदामैल येथे घेतलेल्या बैठकीबाबत..

दिनांक ०५/०७/२०२५ रोजी दुपारी १३:०० वा दरम्यान अमरावती — नागपुर राष्ट्रीय महामार्ग क्रं ६, चौदामैल येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा (तत्कालीन उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग), पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांडे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन कळमेश्वर, पोलीस निरीक्षक श्री वैभव जाधव, प्रभारी अधिकारी जिल्हा वाहतुक शाखा, नागपुर ग्रामीण जिल्हा, पोलीस स्टेशन कळमेश्वर चे अधिकारी आणि अंमलदार ,महामार्ग सुरक्षा विशेष पथक ,नागपुर चे अधिकारी आणि अंमलदार, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण चे संबधित अधिकारी, संबधीत ठेकेदार, चौदामैल येथील सरपंच आणि नागरिक असे हजर होते.

सदर बैठकीमध्ये सर्विस रोडवर पडलेल्या खड्डयांमुळे ट्रॅफिक जाम व सुरू असलेल्या ओव्हरब्रिज चे बांधकामामुळे स्थानिक लोकांना होणाऱ्या त्रासांबाबत चर्चा करण्यात आली. सदर बैठकी मध्ये श्री अनिल म्हस्के यांनी संबधीत कंपनी ठेकेदार यांना रोडवरील खड्डे बुजवुन स्ट्रिट लाईट व सुचना फलक लावण्याबाबत सुचना दिल्या होत्या. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण चे संबधीत अधिकारी यांना लक्ष देण्याबाबत सुचना दिल्या होत्या. सदर सुचनेप्रमाणे संबधीत कंपनी ठेकेदार यांनी सर्विस रोडवरील खड्डे बुजविले असुन लवकरच सिमेंट रोड बनविण्याचे तयारीत आहे. तसेच सदर रोडवर एखादे वाहन बिघाड होवुन अचानक बंद झाल्यास त्याला काढण्याकरीता करणेकरीता हायड्रा ची व्यवस्था तसेच रूग्णवाहीकेची व्यवस्था करण्यात आलेली आहे. संबधीत कंपनी ठेकेदार आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण चे संबधीत अधिकारी यांना पोलीस स्टेशन कळमेश्वर येथुन नमुद बाबतीत पत्र व्यवहार करण्यात आला आहे. तसेच

त्यांना रहदारीच्या अनुषंगाने योग्य सुचना देण्यात आल्या आहे. महामार्ग सुरक्षा विशेष पथक चे पोलीस निरीक्षक यांना सुध्दा योग्य लक्ष देण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहे.





## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद पोलीस स्टेशन भिवापुर ची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक १३/०७/२०२५ रोजी भिवापुर पोलीस पो.स्टे. हददीत पेट्रोलींग करीत असतांना पोलसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी सालेभट्टी फाटा,भिवापुर येथे नाकाबंदी केली असता ट्रक क्र.एम.एच ४० सी. झेड. ४८४८ हा मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रक चालक बादल कैलास देवगडे, वय ३५ वर्षे, रा. अशोक नगर, कन्हान, ता पारशिवनी, जि **जि. नागपुर** याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाचे नाव विरेंद्र शर्मा, रा. हिवरीनगर, ता. जि. नागपुर **जि. नागपुर** असे असल्याची माहीती प्राप्त झाली.पोलीसांनी पंचासमक्ष **१)** ट्रक क्र.एम.एच ४०सी. झेड. ४८४८ किमती ३०,००,००० /रूपये **व २)** ८ ब्रास रेती किंमती ४०,०००/— रूपये आणि असा एकुण ३०,४०,०००/रूपयेचा माल जप्त करण्यात आला.

**नमुद ट्रक चालक आणि मालक याच्या विरूध्द पोस्टे भिवापुर येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चालक आरोपीस अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक १३/०७/२०२५ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मोपेड मो.सा. क्रमांक एम.एच ४० बि.डी. ६२३१ वर अवैधरित्या देशी दारूची वाहतुक केली जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच

पोलीसांनी तात्काळ मौजा आष्टी शिवार, ता. सावनेर येथे नाकाबंदी केली असता मोपेड मो.सा. क्रमांक एम.एच ४० बि.डी. ६२३१ हे वाहन मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन मोपेड चालक आणि त्याचा साथीदार यांना नाव पत्ता विचारले असता वाहन चालक आरोपी क्रं १. नामे चैतराम अमृत जोगी, वय ५६ वर्षे, रा वार्ड क्रं ४ केळवद, ता सावनेर जि. नागपुर आणि त्याचा साथीदार आरोपी क्रं २ नामे मारोती श्रीनिवास बुरलेवार, वय ७४ वर्षे, रा केळवद अशी माहीती प्राप्त झाली आहे. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता नमुद वाहनावर प्लॉस्टीक बोऱ्या मध्ये देशी दारू भिंगरी संत्रा नं ०१ २४० निपा प्रत्येकी १८० मिली किंमती १६,८०० /— रूपये आणि मोपेड मो.सा. क्र एम.एच ४० ए.एफ ६२३१ किंमती ६०,०००/— रूपये. असा **एकुण किंमती ७६,८००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**सदर प्रकरणी नमुद दोन्ही आरोपीतांच्या विरूध्द कलम ६५ (अ) म.दा.का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## खुन करणाऱ्या आरोपीला तात्काळ अटक, देवलापार पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार :—** फिर्यादी नामे मेघराज सुरतराम कोकोडे, वय २८ वर्षे, रा.मानेगाव टेक ता.रामटेक जि.नागपुर यांनी पोलीस स्टेशन देवलापार येथे तोंडी रिपोर्ट दिली की, नमुद गुन्हयातील आरोपी नामे संजीव उर्फ संजु मन्साराम भलावी वय ४१ वर्ष रा.मानेगाव टेक ता. रामटेक जि.नागपुर याने फिर्यादीची आत्या मृतक नामे कमलाबाई हिरामन वरखडे वय अंदाजे ६५ वर्ष रा.मानेगाव टेक हिचे घरामागील बाथरूम मधील भरून ठेवलेले पाणी फेकल्याने मृतक हीने त्याला पाणी का फेकले याबाबत विचारना केली होती. त्याचा राग येवुन यातील आरोपी याने मृतकाचे घराचे दार तोडुन घरात घुसुन तु मला पाणी फेकले याबाबत का बोलेली असे म्हणुन काठीने लाथा बुक्याने मारहान करुन तिला गंभीर जखमी केले व तेथुन निघुन गेला. गंभीर मारहाणी मुळे मृतक हिच्यावर सरकारी दवाखान्यात उपचार सुरु असतांना तिचा मृत्यु झाला आहे. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे देवलापार येथे आरोपी विरूद्ध कलम १०३(१),३३३ भा.न्या.सं २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

**घटनेनंतर सदर आरोपी हा पळुन गेला होता. देवलापार पोलीसांनी तात्काळ गुप्तबामीदाराच्या मार्फत माहीती काढुन नमुद आरोपीला महाराष्ट्र — मध्यप्रदेश बॉर्डरवरून**

**ताब्यात घेवुन अटक केली आहे. मा. न्यायालयाने नमुद आरोपीतांचा दिनांक १६/०७/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मध्य मंजुर केला आहे.**

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

**पोलीस स्टेशन जलालखेडा :—** पोलीस स्टेशन जलालखेडा येथे फिर्यादी श्रीमती सुमन रामराव चचाने, वय ६० वर्ष, रा. दावसा. ता. नरखेड जि. नागपुर यांनी रिपोर्ट दिली की, १२/०७/२०२५ चे १८.०० ते १८.३० वा दरम्यान फिर्यादीचा मुलगा आरोपी कैलास रामराव चचाने, ,वय ३६ वर्ष, रा. दावसा ता. नरखेड जि. नागपुर हा घरातील भांडे घरातच फेकत होता आणि घरात असलेल्या गादी पेटुन घर जाळयाचा प्रयत्न करीत असतांना त्याला फिर्यादीने त्याला थांबविले व त्याचे हात धरून बाहेर काढत असताना आरोपीने फिर्यादीची गच्ची, फिर्यादीचे तोंड व नाक दाबुन फिर्यादीला जीवे मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन जलालखेडा येथे कलम १०९, ३२६, ३२४ (४) भान्यासं अन्वये आरोपी विरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या २३ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये,गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत दिनांक १३/०७/२०२५ रोजी अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे २३ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** :— पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत आरोपी क्रं १) नामे रमेश बाबुलाल श्रीपात्रे वय ६८ वर्ष रा. पवनसुम नगर रमना मारोती नागपुर ह.मु. शाळा क्र. ०११ सरोस्वती नगर काटोल त. काटोल , आरोपी क्र. ०२), गुलाब दिपक चव्हान वय ५५ वर्ष रा. अण्णपुर्णा नगर काटोल त. काटोल, आरोपी क्रं ३) नजीर रशीद शेख वय ६५ वर्ष रा. हेटी पेठबुधवार काटोल ता. काटोल त. काटोल आणि आरोपी क्रं ४) हसन दिलावर शहा वय ७० वर्ष रा. किल्ला वार्ड पेठबुधवार काटोल त. काटोल असे आरोपी तारबाजार काटोल येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले, नमुद आरोपीतांवर एन.डी.पी.एस कायदयान्वये ४ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत आरोपी नामे दुर्गा जानराव अंभोरे, वय ७४ वर्ष, रा.मच्छीद्रनाथ चौक, जवळ न्यु भिम नगर, अकोला, जि.अकोला हे बाजार चौक येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीवर एन.डी. पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड** :— पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत आरोपी क्रं १) भाउराव मारोतराव बांदरे, वय ७४ वर्ष, रा. वार्ड क्र १७ मोवाड ता नरखेड आणि आरोपी क्रं २) सुधाकर सुर्यभान कनिरे, वय ५८ वर्ष, रा. खैरगाव, ता. नरखेड असे आरोपी मौजा मोवाड येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले, नमुद आरोपीवर एन.डी.पी.एस कायदयान्वये २ गुन्हा नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार :—** पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत आरोपी महम्मदहनीफ रहेमुल्ला अंन्सारी, वय ६७ वर्ष, रा.देवलापार ता.रामटेक जि.नागपुर, हा मौजा देवलापार येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीवर एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन मौदा :—** पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत आरोपी मिलाप अंतु तलवारे, वय ४५ वर्ष, रा. केसलापूर, ता. मौदा हा मौजा शिवमंदीरा मागे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीवर एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**पोलीस स्टेशन कन्हान:—** पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत आरोपी विकासकुमार शामसुंदर भारती वय २४ वर्ष रा.नदीरा ता.दुधये जि. सोनभद्रे, उत्तर प्रदेश, ह.मु.कांद्री, कन्हान हा टेकडी गावाकडे जाणाऱ्या बसस्टॅड जवळ अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीवर एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापरखेडा :—** पोलीस स्टेशन खापरखेडा अंतर्गत आरोपी क्रं १) विनोद अरुणदास चौधरी, वार्ड नंबर ४, सिल्लेवाडा, आणि आरोपी क्रं २) मोहम्मद इरफान मुस्ताक मन्सुरी, ३२ वर्षे वार्ड नंबर ०६ जामा मस्जिद जवळ वलनी हे वलनी नदी घाट, पांदण रोड येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीतांवर एन.डी.पी. एस कायदयान्वये ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कळमेश्वरः—** कळमेश्वर पोलीस स्टेशन अंतर्गत आरोपी क्रं १) रूपराव काशिनाथ बन्सोड, वय ३८ वर्षे, रा.म्हसेपठार, ता कळमेश्वर आणि आरोपी क्रं २) गणेश धनराज खडसे वय ३९ वर्षे, रा. वार्ड क्र १२, इंदीरा नगर, कळमेश्वर, ता. कळमेश्वर हे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीतांवर एन.डी.पी.एस कायदयान्वये ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा :—** खापा पोलीस स्टेशन अंतर्गत आरोपी क्रं १) रंगराव उकंडराव खंडारे ,वय ५८ वर्ष, रा,वाकी ता.सावनेर जि.नागपूर आणि आरोपी क्रं २ अशोक गोदरू रंगारी, वय ५२ वर्ष, रा. वाकोडी, ता. सावनेर, जि.नागपूर हे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीतांवर एन.डी.पी.एस कायदयान्वये ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन उमरेड :—** उमरेड पोलीस स्टेशन अंतर्गत आरोपी क्रं १) राजेश नागेराव बेम्पे ,वय ४५ वर्ष, रा आकोली, ता. सेलु जि वर्धा आणि आरोपी क्रं २) स्वास्तीक राजेन्द्र नितनवरे वय २३ वर्ष, रा. शिवनगर, गजानन मंदीर जवळ, एम आय डी सी उमरेड हे मौजा भिवापुर वाय पॉईन्ट येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीतांवर एन.डी.पी.एस कायदयान्वये ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन सावनेर :—** पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत आरोपी नितीन मारोती धकाते, वय ४० वर्ष, रा वार्ड क्र ०९ चिचपुरा, सावनेर हा वार्ड क्र १४ चिचपुरा, स्मशान भुमी येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीवर एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**पोलीस स्टेशन कुही :—** कुही पोलीस स्टेशन अंतर्गत आरोपी क्रं १) प्रणय राजेद्र वडेश्वर वय २० रा विठठलनगर ०१ हुडकेश्वर नागपुर आणि आरोपी क्रं २) पवन मुलचंद बिलवने वय २० रा विठठलनगर ०१ हुडकेश्वर नागपुर हे मौजा मौजा मटकाझरी दर्गा येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीतांवर एन.डी.पी.एस कायदयान्वये ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरीः—** पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत अभय अशोक नारायणे, वय २७ वर्षे, रा टाकळघाट, ता हिंगणा, जि. नागपुर हा मौजा टाकळघाट येथे

अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीवर एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन बेला :—** पोलीस स्टेशन बेला अंतर्गत आरोपी दिनेश अशोकराव पराते, वय ३३ वर्षे, रा. वार्ड नं. ५, सिर्सि ता. उमरेड जि. नागपूर हा सिर्सि बाजार येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीवर एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आले आहे.

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या एकुण १६ आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये २३ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक १३/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १४/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत बालाजी नगर,गरडापार,मंगळवारी पेठ, कावरा पेठ, नायडु बाजार, अभ्यंकर चौक येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्रीमती वृष्टी जैन यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच हॉटेल लॉजेस ची तपासणी करण्यात आली. बायपास चौक उमरेड येथे नाकाबंदी करण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन सह दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.






USA


MH 46 X 6025
Jul 13, 2025, 23:32




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने